साप्ताहिक

# सहकारनामा

●Regd.No.MAHMAR49983 ●Declaration No.SDM/SR/01.2020, Dt.21/10/2020
Email :saharnamanews@gmail.com

संपादक - श्री.अब्बास इसाक शेख मोबा.९०९६७७७७५०

वर्ष-१ ले | अंक - १० वा | सोमवार दिनांक २२ जानेवारी २०२१ ते २८ नोव्हेंबर २०२० दौंड (पुणे) | पाने - ४ | किंमत ३ रु.

# भाजपच्या २७ सरपंच, ३३ उपसरपंचांचा जाहीर सत्कार

दौंड : सहकारनामा

दौंड तालुक्यातील ५१ ग्रामपंचायतीच्या सरपंच उपसरपंच सदस्यांचा सत्कार समारंभ भाजपचे आमदार राहुल कुल यांच्या हस्ते आज दि.१५ फेब्रुवारी रोजी पार पडला. या मध्ये भाजपचे २७ सरपंच ३३ उपसरपंच तर ३२५ ग्रामपंचायत सदस्य व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

२७ ग्रामपंचायतींचे सरपंच या कार्यक्रमाला उपस्थित असल्याने राष्ट्रवादीने केलेला ३२ जागांचा दावा फोल ठरला असल्याची चर्चा तालुक्यात सुरू आहे. या सत्कार समारंभ कार्यक्रमात आमदार राहुल कुल यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या काळात दौंड तालुक्याला भरघोस असा निधी मिळाला असल्याचे सांगितले. दौंड तालुक्यातून गेलेला १०० कि.मी.चा ३०० कोटींचा अष्टविनायक महामार्ग रस्ता हे त्याचे उत्त' उदाहरण असून या रस्त्यामुळे तालुक्यातील दळण वळणाची बराचशी अडचण दूर होणार आल्याचे त्यांनी सांगितले. पुढे बोलताना त्यांनी राज्यात भाजपचे सरकार लवकरच येऊ शकते असे म्हणत केंद्र आणि राज्य शासनाच्या अनेक योजना आहेत त्याचा जनतेने लाभ घ्यावा असे आवाहन केले आणि १५०० कोटींपर्यंत आपण विकास कामांची झेप घेतली आहे आणि हे विरोधकही नाकारू शकनार नाही असे आव्हान त्यांनी विरोधकांना दिले आहे. तालुक्यात विविध बाबींवर बोलताना दौंड तालुक्यात आरोग्याच्या दृष्टीने अनेक कामे झाली आहेत, विविध गावांतील रहिवासी अतिक्रमण नियमित करण्याचा आपला पूर्ण प्रयत्न आहे व त्याबाबत अनेक गावांत सुरुवातही झाली असल्याचे सांगून निवडून येणे एक वेळेस सोपे आहे पण जनतेच्या अपेक्षा पूर्ण करणे अवघड असते त्यामुळे पूर्ण ताकदीने आपण जनतेची कामे केली तर विजय निश्चित होतो असा विश्वास शेवटी त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भाजप तालुकाध्यक्ष माऊली अण्णा ताकवणे यांनी केले तर वासुदेव नाना काळे, नामदेवनाना बारवकर यांची भाषणे झाली. या कार्यक्रमाला माजी आमदार श्रीमती रंजनाताई कुल, भाजप महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्षा कांचनताई कुल, भीमा पाटसचे मा.व्हाईस चेरमन आनंददादा थोरात, व्हाईस चेरमन नामदेव नाना बारवकर, धनाजीभाऊ शेळके यांसह विविध पदाधिकारी, मान्यवर व कार्यकर्ते उपस्थित होते.



सरपंच, उपसरपंच सत्कार प्रसंगी आमदार राहुल कुल व उपस्थित नवनिर्वाचित सरपंच,उपसरपंच,ग्रामपंचायत सदस्य






# संपादकिय

## खबरदारी हा' चांगला उपाय

राज्यात पुन्हा एकदा कोरोनाने थैमान घालण्यास सुरुवात केली आहे. राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये कोरोनाचे रुग्ण वाढणे हि चिंतेची बाब आहे. त्यामुळे आता यावर चांगला उपाय म्हणजे खबरदारी' घेणे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

पुणे जिल्ह्यामध्ये सध्या ॲक्टिव्ह रुग्णांची संख्या वाढू लागली आहे. लोकांनी नियम पायदळी तुडवून बिनधास्त फिरणे आणि कोणतीही खबरदारी न घेणे यामुळे संशयित रुग्णांमध्ये वाढ होत चालली आहे. लॉकडाऊनची वाटचाल अनलॉककडे होत असताना नागरिकांनी सर्व बंधने झुगारून रस्त्यावर पहिल्यासारखे फिरणे आता महागात पडू लागले आहे. तोंडाला मास्क नाही, प्रत्येक ठिकाणी मोठी गर्दी, वापरातून दुर्मिळ झालेले सॅनिटायजर आणि एकदुसऱ्या सोबत सुरू झालेले हस्तांदोलन हे पुन्हा कोरोना सक्रिय होण्यासाठी पुरेसे ठरत आहे. कोरोना अजून गेलेला नाही, हे सरकार आणि शासकीय यंत्रणा सांगत आहेत मात्र त्या पद्धतीने लोक त्याला गंभीरतेने घेत नसल्याचे दिसून येत आहे.

जर कोरोनापासून स्वतःला दूर ठेवायचे असेल तर स्वतःच स्वतःला काही बंधने घालून घेणे गरजेचे आहे. अन्या कोरोनाचा विषाणू थैमान घालण्यास वेळ लागणार नाही हे उघड आहे. सध्या ग्रामिण भागातही कोरोनाचे नव्याने संशयित रुग्ण सापडत आहेत. अनेक खाजगी हॉस्पिटलमध्ये अशा संशयित रुग्णांचा भरणा वाढला आहे. हे का होत आहे याच्या खोलवर गेल्यास स्वतःच्या चुका निश्चित समोर येतील यात शंका नाही. यासाठी आता खबरदारी हा सर्वात चांगला उपाय असून हात स्वच्छ साबणाने धुणे, मास्क घालणे, सॅनिटायजरचा वापर करणे, गर्दी टाळणे (स्वतः गर्दीपासून दूर राहणे) हे उपाय केल्यास नक्कीच कोरोना आटोक्यात येऊ शकेल, त्यामुळे आता खबरदारी हाच चांगला उपाय मानावा लागेल.

# 'या' कारणामुळे शेतकऱ्यांनी शिवजयंती केली शेतातच साजरी

दौंड : सहकारनामा

दौंड तालुक्यातील कानगाव येथे अखंड हिंदुस्तानाचे आराध्य दैवत असणारे छत्रपती शिवरायांच्या जन्मोत्सवाचा सोहळा शेतकऱ्यांनी आपल्या शेतावरच साजरा केला आहे.

शेतकऱ्यांनी हा सोहळा शेतात साजरा करण्यामागचे कारण सांगताना राज्य शासनाने शिवनेरीवरती १४४ कलम म्हणजे जमावबंदी लावलेली होती. म्हणून शेतकऱ्यांनी शिवजयंती शेतावरच साजरी करावी व शिवरायांच्या समोर कृषी पंपाच्या वीज बिलाची होळी करावी असे आदेश माजी कृषी राज्यमंत्री सदाभाऊ खोत यांनी दिले होते असे सांगितले.

शिवराज्या मध्ये शेतकऱ्याच्या भाजीच्या देठालाही हात लावू नका, असा आदेश आपल्या सैनिकांना देणारे शिवरायांच्या महाराष्ट्रामध्ये कृषी पंपाचे कनेक्शन तोडून शेतकऱ्यांचे उभे पीक जाळण्याचा घाट राज्य सरकार व वीज वितरण कंपनीने घातलेला आहे. म्हणून आज शिवजयंतीच्या दिवशी शिवरायांच्या पुतळ्याचे पूजन करून शिवरायांच्या समोर कृषी पंपाच्या वीज बिलांची होळी करण्यात आली आहे.

यावेळी संघटनेचे राज्य प्रवक्ते भानुदास शिंदे, कानगावचे सरपंच राहुल चाबुकस्वार, विकास सोसायटीचे चेअरमन ॲड भास्कर फडके, जिल्हा सरचिटणीस सयाजी मोरे कानगाव ग्रामपंचायत सदस्य रमेश गवळी, संतोष शेलार, रामदास पवार, सदाशिव नलवडे, शेतकरी नामदेव फडके,अक्षय निगडे, विकास गवळी, निलेश वाघ, श्री खळतकर, अक्षय चौधरी, श्री निगडे, योगेश गवळी धनंजय कोर्हाळे सह अनेक युवा वर्ग सहभागी झाले होते.



छत्रपती शिवरायांच्या जन्मोत्सवाचा सोहळा शेतकऱ्यांनी आपल्या शेतावरच साजरा केला

# राज्याच्या आरोग्य मंत्र्यांना कोरोनाची लागण, एकाच दिवसात ३ मोठे नेते पॉझिटिव्ह

मुंबई : सहकारनामा

राज्यात कोरोनाने पुन्हा एकदा डोके वर काढले आहे. कोरोनाची दुसरी लाट सुरू झाली की काय याबाबत आता चर्चा सुरू झाली आहे. हे सर्व सुरू असतानाच आता पुन्हा राज्याच्या आरोग्य मंत्र्यांनाच कोरोनाची लागण झाल्याची बातमी समोर आली आहे.

राज्याचे आरोग्यमंत्री राजेश टोपे यांना कोरोनाची लागण झाली असून त्यांनी स्वतः याबाबत ट्टीटरवरून माहिती दिली आहे. धक्कादायक बाब म्हणजे गुरुवारी एका दिवसात राष्ट्रवादी काँग्रेसच्या ३ मोठ्या नेत्यांना कोरोनाची बाधा झाल्याने कोरोनाची दुसरी लाट सुरू झाली की काय असा संशय व्यक्त केला जाऊ लागला आहे. अगोदर राज्याचे जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांना कोरोनाची लागण झाली नंतर त्या पाठोपाठ राष्ट्रवादीचे मोठे नेते एकना खडसे हे पॉझिटिव्ह आले आणि आता आरोग्य मंत्री राजेश टोपे यांनाही कोरोनाची लागण झाल्याने चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

काल गुरुवारी एका दिवसातच राज्यात जवळपास ५ हजार ४२७ नवीन कोरोना पॉझिटिव्ह रुग्ण सापडले आहेत. राज्यातील व्हीआयपी पर्सन व्यक्तींनाही कोरोनाचा प्रादुर्भाव झाल्याने नागरिकांनी सतर्क होण्याची वेळ आली आहे.

# स्वच्छतेसाठी युवा सरपंचांनी घेतला हातात झाडू

दौंड : सहकारनामा

कीर्तनातून शिक्षणाचे व स्वच्छतेचे महत्व समाजाला पटवून प्रबोधन करणारे संत गाडगे महाराज (संत गाडगे बाबा) यांच्या जयंती निमित्त खडकी येथील नव निर्वाचित युवा सरपंच कु. स्नेहल संजय काळभोर यांनी हातात झाडू घेऊन स्मशान भूमी साफ करत युवा पिढीसमोर आदर्श निर्माण केला आहे. संत गाडगे महाराज यांच्या जयंतीनिमित्त खडकी ग्रामपंचायती तर्फे स्मशानभूमी स्वच्छता अभियान राबवून स्मशानभूमीत साफसफाई करण्यात आली. यावेळी युवा सरपंच कु.स्नेहल काळभोर, संजय बापू काळभोर मा सदस्य जि.प. विकास काळे, राहुल काळभोर आणि ग्रामपंचायतीचे सर्व कामगार बांधव उपस्ति होते.

युवा सरपंचांनी वडिलांसोबत झाडू हातात घेऊन ग्राम स्वच्छता अभियान सुरू केल्याने त्यांचे कौतुक होत आहे.

# दौंड शहरामध्ये शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी

दौंड : सहकारनामा

शहरातील सर्व शिव प्रेमींनी एकत्र येत छत्रपती शिवाजी महाराज जयंती मोठ्या उत्साहात साजरी केली आहे. सर्वप्रथम नगराध्यक्षा शितल कटारिया यांच्या प्रमुख उपस्थितीत महिलांनी पाळणा गीत गात शिवजन्म सोहळा साजरा केला. नंतर शहरातील जमलेल्या सर्व शिवप्रेमी, पक्ष, संघटना व विविध समाजातील प्रमुखांच्या उपस्थिती मध्ये शिवाजी महाराजांची आरती करण्यात आली.

मोठ्या संख्येने जमलेल्या शिवभक्तांनी महाराजांच्या स्मारकास पुष्पहार अर्पण करीत विनम्र अभिवादन केले. दौंडचे पोलीस निरीक्षक नारायण पवार, पंचायत समितीचे गटविकास अधिकारी अजिंक्य येळे, नगराध्यक्ष शितल कटारिया सर्व नगरसेवक यावेळी उपस्थित होते. शिवजयंती निमित्ताने येथील शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यास आकर्षक सजावट करण्यात आली होती, सजविलेल्या अश्वारूढ पुतळ्या सोबत शिवप्रेमींनी सेल्फी फोटो घेत शिवजयंतीचा आनंद साजरा केला.

## दौंड मधील कोरोना योद्ध्यांचा पुण्यात सन्मान

दौंड : सहकारनामा

कोरोना काळामध्ये सामाजिक कामात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या कोरोना योद्ध्यांना कोटक महिंद्रा इन्शुरन्स कंपनी(पुणे)च्या वतीने सन्मानित करण्यात आले.

पुणे येथे झालेल्या समारंभा मध्ये डॉक्टर्स, उद्योजक, सामाजिक कार्यकर्ते, शिक्षण, राजकीय आदी क्षेत्रातील मान्यवरांनी कोरोना काळात केलेल्या समाज कार्याबद्दल त्यांना स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले. दौंड मधील महालक्ष्मी हॉस्पिटलच्या संचालिका डॉ.शलाका लोणकर व रत्नात्रय ज्वेलर्स चे सुनील शहा यांना ही कोविड योद्धा म्हणून गौरविण्यात आले आहे. कंपनीचे सह महाव्यवस्थापक सत्येंद्र सिंग यांच्या हस्ते सर्व कोरोना योद्ध्यांचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी कोटक महिंद्राचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अब्बास इसाक शेख यांनी प्रिती प्रिंटिंग प्रेस हरिनिर्मल कॉम्प्लेक्स, हरिकृपानगर, मार्केट यार्ड समोर, इंदापूर रोड, बारामती,ता.बारामती, जि.पुणे (महाराष्ट्र) या ठिकाणी छापून केडगाव मस्जीद जवळ, केडगाव, ता.दौंड, जि.पुणे (महाराष्ट्र)-४१२२०३ येथून प्रसिध्द केले.

या अंकात प्रसिध्द झालेल्या लेखातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# छत्रपती संभाजी महाराज फेम येसूबाई (प्राजक्ता गायकवाड) कडून खडकीच्या युवा सरपंच स्नेहल काळभोरचा सत्कार

दौंड : सहकारनाता

छत्रपती संभाजी महाराज या मालिकेतून येसूबाई यांची भूमिका साकारून अफाट लोकप्रियता मिळविलेल्या येसूबाई उर्फ प्राजक्ता गायकवाड यांनी आज दौंड तालुक्यातील खडकी या गावाला भेट दिली.

यावेळी सिनेअभिनेत्री प्राजक्ता गायकवाड उर्फ येसूबाई आणि सिने अभिनेते सुभाष यादव यांनी दौंडच्या सर्वात कमी वयाच्या महिला सरपंच असलेल्या स्नेहल काळभोर यांची भेट घेऊन त्यांचा सत्कार केला तसेच पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी सरपंच स्नेहल काळभोर यांनी प्राजक्ता गायकवाड यांचे आभार मानून त्यांनी दाखवलेला विश्वास आणि आपले पणाच्या भावनेला कुठेही तडा जाऊन न देता जनतेच्या कामातून याची पावती देणार असल्याचे सांगितले. स्नेहल काळभोर या नुकत्याच खडकी गावच्या सरपंचपदी विराजमान झाल्या असून त्या सर्वात कमी वयाच्या महिला सरपंच म्हणून त्यांनी तालुक्यात बहुमान मिळवला आहे. स्नेहल काळभोर यांचे वडील संजय काळभोर हे या विभागाचे जिल्हापरिषद सदस्य होते. त्यांनी केलेल्या कामाची पावती म्हणून जनतेने त्यांच्या मलीला निवडून देऊन सर्वात कमी वयात सरपंचपद बहाल केले आहे हे विशेष



दौंडच्या सर्वात कमी वयाच्या महिला सरपंच असलेल्या स्नेहल काळभोर सत्कार स्विकारताना

# बारामतीमध्ये नऊ वर्षाच्या मुलीवर अत्याचार

बारामती : सहकारनामा

बारामती तालुक्यामध्ये अवघ्या ९ वर्षाच्या मुलीवर बलात्कार करण्यात आल्याची मानवतेला काळिमा फासणारी घटना घडली आहे. या प्रकरणी वडगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी २५ वर्षीय नराधमास अटक केली आहे.

हि भयानक घटना बारामतीच्या उंडवडी परिसरामध्ये घडली असून या प्रकरणी २५ पंचवीस वर्षीय नराधमास पोलिसांनी अटक करून त्यास न्यायालयात हजर केले असता त्यास पाच दिवसांची पोलीस कोठडी देण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. मिळालेल्या माहितीनुसार या नराधम युवकाने या नऊ वर्षाच्या मुलीला शेतात घेऊन जाऊन तिच्यावर बलात्कार केला होता. हि माहिती पीडित मुलीच्या आई वडिलांना समजताच त्यांनी थेट वडगाव निंबाळकर पोलीस ठाण्यात जाऊन याबाबत फिर्याद दिली होती. बलात्काराची फिर्याद येताच वडगावचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सोमनाथ लांडे, आणि त्यांच्या पथकाने आरोपीला जेरबंद करून त्यास बारामतीच्या न्यायालयात हजर केले असता त्यास ५ दिवसाची पोलीस कोठडी देण्यात आली. या घटनेचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक वाय. ए. शेलार करीत आहेत.

# यवत पोलिसांचा वाळू माफियांना पुन्हा दणका, १२ लाखाच्या २ यांत्रिक बोटी उधवस्त

दौंड : सहकारनामा

दौंड तालुक्यामध्ये वाळू माफियांनी डोके वर काढल्यानंतर पोलिसांकडूनही त्यांना जशासतसे उत्तर मिळत आहे.

आज दि.१८/०२/२०२१ रोजी यवत पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक भाऊसाहेब पाटील यांच्या मार्गदर्शना खाली यवत पोलीस स्टेशन येथील पोलीस कॉन्स्टेबल हेमंत कुंजीर, पोलीस कॉन्स्टेबल सुजित जगताप, पोलीस कॉन्स्टेबल सो'ना सुपेकर, पोलीस कॉन्स्टेबल नारायण जाधव व महसूल कर्मचारी पुंडलिक केंद्रे, तलाठी मिरवडी अभिमन्यू जाधव, यांच्या पथकाने दौंड व हवेली तालुक्यातील हद्दीवरील मिरवडी तालुका दौंड या गावच्या हद्दीतील मुळा मुठा नदी पत्रात अवैद्यरित्या बेकायदेशीर वाळू उपसा करून पर्यावरणास हानी करून सार्वजनिक नदीपात्राचे नुकसान करणाऱ्या २ वाळूच्या यांत्रिक फायबर बोटी उधवस्त करून वाळू उपसा करणाऱ्या माफियांना मोठा दणका दिला आहे. वाळू माफिया मिरवडी व इतर ठिकाणी वाळू उपसा करत असल्याची माहिती या पकाला लागल्यानंतर त्यांनी ही कारवाई केली आहे. सदरची कारवाई मा.पोलिस अधीक्षक, श्री.डॉ.अभिनव देशमुख यांचे सूचनेनुसार, पोलीस निरीक्षक श्री.भाऊसाहेब पाटील, पो कॉ हेमंत कुंजीर, पो कॉ सोमना सुपेकर, पो कॉ सुजित जगताप, पो कॉ /नारायण जाधव व महसूल कर्मचारी पुंडलिक केंद्रे, तलाठी मिरवडी अभिमन्यू जाधव यांच्या पथकाने केली आहे.

# महिला शिक्षिकेचे दागिने पळविणाऱ्या भामट्यास लोणीकाळभोर पोलिसांकडून अटक

लोणी काळभोर : सहकारनामा

सोलापूर जिल्ह्यातील एका शिक्षिकेशी जुजबी तोंड ओळख असलेल्या इसमाने खोटे नाव सांगून सोन्याचे दागिण्यासाह रोख रक्कम ७५ हजार रुपये पळवून नेणाऱ्या इसमाला लोणी काळभोर पोलिसांनी अटक केली आहे.

गणेश शिवाजी कारंडे (वय-३६, रा. श्रीपूर,ता.माळशिरस,जि. सोलापूर) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. सदर आरोपी हा त्याचे नाव योगेश पाटील आहे असे सांगत असे. पोलिसांनी दिलेल्या महितीनुसार, २६ जानेवारीला सोलापूर जिल्ह्यातील एका महिला शिक्षिकेला केवळ जुजबी तोंड ओळख वाढवून खोटे नाव असलेल्या योगेश पाटील याने शिक्षक महिलेचे ७५ हजार रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम पळवून नेल्याची घटना पुणे-सोलापूर महामार्गावरील ऊरुळी देवाची ग्रामपंचायत हद्दीत घडली होती. त्यानुसार लोणी काळभोर पोलिस ठाण्यात योगेश पाटील नावाच्या व्यक्ति विरोधात गुन्हा दाखल केला होता. त्यानुसार लोणी काळभोर पोलिसांनी योगेश पाटील या नामक व्यक्तीचा शोध घेण्यास सुरुवात केली होती. दरम्यान, हा तपास लोणी काळभोर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक सूरज बंडगर यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक राजू महानोर यांनी तपास सुरू केला. त्यानुसार योगेश पाटील यांनी चोरी केलेल्या मोबाइल फोनवरून आरोपी हा श्रीपूर ता. माळशिरस जि. सोलापूर येथे राहत असल्याचे समजले. त्यानुसार आरोपीला त्याच्या घरी जाऊन पकडण्यात पोलिसांना यश आले. त्याच्याकडून अधिक चौकशी केली असता योगेश पाटील याने त्याचे नाव योगेश पाटील नसून गणेश शिवाजी कारंडे आहे असे संगितले. व केलेल्या गुन्ह्यांची कबूली दिली आहे. गणेश कारंडे यांच्याविरोधात अगोदरही लोणी काळभोर पोलिसात महिलांची छेड काढण्याचा गुन्हा दाखल आहे. तपास पोलीस निरीक्षक सुरज बंडगर करीत आहेत.

# राज्यात कोरोनाचा प्रादुर्भाव वाढू लागला, जलसंपदा मंत्री जयंत पाटलांना कोरोनाची लागण

मुंबई - सहकारनामा

राज्यात पुन्हा एकदा कोरोनाने आपले डोके वर काढण्यास सुरुवात केली आहे.

राज्यात काही ठिकाणी कोरोनाचे रुग्ण वाढत असतानाच आता राज्याचे जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांनाही कोरोनाची लागण झाली असल्याचे समोर येत आहे. स्वतः जयंत पाटील यांनी ट्वीट करून याबाबत माहिती दिली असून त्यांनी ट्वीट करताना आपली कोरोना चाचणी पॉझिटिव्ह आली असल्याचे म्हटले आहे.

नुकतीच त्यांची परिसंवाद यात्रा झाली आहे. यात त्यांना चांगला प्रतिसाद मिळाला होता. मात्र त्यांना कोरोनाची लागण झाल्याचे समजल्यानंतर त्यांनी आपल्या संपर्कात आलेल्या व्यक्तींनीही खबरदारी म्हणून स्वतःची कोरोना टेस्ट करून घेण्याचे आवाहन केले आहे. राज्यात पुन्हा कोरोनाचा प्रादुर्भाव वाढू लागल्याने आता सर्वांनी खबरदारीचे उपाय करणे गरजेचे बनले आहे. तोंडाला मास्क लावणे, सॅनिटायजरचा वापर करणे, सुरक्षित अंतर ठेवणे, गर्दीत जाणे टाळणे इत्यादी उपाय करण्याची गरज निर्माण झाली आहे.

# पूजा चव्हाण प्रकरण दाबण्यासाठी सरकारचा पोलिसांवर दबाव! विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस

मुंबई : सहकारनामा

पुण्यातील पूजा चव्हाण या तरुणीने केलेल्या आत्महत्येचे प्रकरण आता अतिशय तप्त झाल्याचे पाहायला मिळत आहे. पूजा चव्हाण हिने आत्महत्या केल्यानंतर भाजपने हे प्रकरण उचलून धरले आहे.

या प्रकरणाची सखोल चौकशी होऊन यातील आरोपींना अटक व्हावी अशी नागणी भाजपने पोलीस आयुक्तांकडे केल्यानंतर आज राज्याचे माजी मुख्यमंत्री आणि विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी देखील या प्रकरणावर आपली परखड भूमिका मांडली आहे. पत्रकारांनी पूजा चव्हाण प्रकरणावर विचारलेल्या प्रश्नावर त्यांनी बोलताना राज्य सरकारकडून हे प्रकरण दाबण्याचे आदेश पोलिसांना दिले गेले असल्याचा गंभीर आरोप केला आहे. या प्रकरणातील एक संशयित मंत्री अजूनही पोलिसांना सापडत नसल्यासाबाबत पत्रकारांनी त्यांना प्रश्न केला होता त्यावर त्यांनी वरील प्रमाणे आपली प्रतिक्रिया दिली.


निर्भिड बातम्यांचे व्यासपीठ

साप्ताहिक सहकारनामा

आजच अंकाची मागणी करा

मोबा.९०९६७७७७५०





# केडगाव, पाटस, मळदसह दौंड ग्रामिण मध्ये तब्बल ४४ कोरोना बाधित

दौंड : सहकारनामा

दौंड तालुक्यातील विविध गावांमध्ये पुन्हा कोरोना बाधित रुग्ण सापडू लागले आहेत.

दौंडच्या तालुका वैद्यकीय अधिकारी पोळ मॅडम यांच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार केडगाव ३, पाटस ५, मळद ४ यांसह इतर ग्रामिण भागातून तब्बल ४४ कोरोना बाधित रुग्ण आढळून आले आहेत. अनलॉकच्या दिशेने वाटचाल सुरू असताना पुन्हा एकदा कोरोनाने डोके वर काढल्याने नागरिकांनी खबरदारी घेण्याची गरज निर्माण झाली आहे.दौंड तालुक्यात कोरोना आटोक्यात येत असताना पुन्हा त्याचा उद्रेक होत असल्याने नागरिकामध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. कोरोना विषाणूचा मुकाबला करण्यासाठी सध्या तालुक्यात कोविड योद्ध्यांना लसीकरण सुरू आहे. हि लस लवकरच सर्वसामान्यांना मिळेल अशी आशा व्यक्त केली जात आहे. नागरिकांनी मास्क घालावे, हात साबणाने स्वच्छ धुवावेत, सॅनिटायजरचा वापर करावा, गर्दीत जाणे व गर्दी टाळावी असे आवाहन आरोग्य अधिकारी पोळ मॅडम यांनी केले आहे.

# लग्नास आलेल्या महिलेच्या गळ्यातील २ लाख ७० हजारांचे दागिने पळविले

लोणीकाळभोर :

मंगलकार्यालया शेजारी असलेल्या शेतामध्ये गेलेल्या एका विवाहित महिलेचे सुमारे पावणे तीन लाख रुपये किमतीचे सोन्याचे दागिने अज्ञात चोरट्याने पळवून नेल्याची घटना घडली आहे.

हि घटना कुंजीरवाडी (ता. हवेली ) हद्दीतील एका खाजगी मंगलकार्यालयात सोमवारी रात्री साडेनऊ वाजण्याच्या सुमारास घडली असून याप्रकरणी संध्याराणी सतीश सोनवणे (वय-४५ रा. लोणंद ता. खंडाळा, जि. सातारा ) यांनी अज्ञात चोरट्याविरोधात लोणी काळभोर पोलिसात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संध्याराणी सोनवणे घरकाम करतात त्या सो'वार दि.२२ फेब्रुवारी रोजी नातेवाईकाचे लग्न असल्याने कुंजीरवाडी येथील एका खाजगी मंगल कार्यालयात आल्या होत्या. रात्री ९.३० वाजण्याच्या सुमारास जेवण झाल्यानंतर मंगलकार्यालया शेजारी असणाऱ्या शेतात त्या नातेवाईकांसह फिरण्यास गेल्या होत्या. तेथून परत येताना त्यांच्या शेजारून एक अनोळखी इसम (वय अंदाजे २५ ते ३० वर्ष) अंगाने सडपातळ, अंगात काळे रंगाचा शर्ट घातलेला व त्यावरती फुले असलेला शर्ट व काळ्या रंगाची पॅन्ट असा पेहराव असलेला त्याने काही समजण्याच्या आतच संध्याराणी सोनवणे यांना धक्का दिला. व गळ्यामधील सोन्याचे दागिने हिसकावून अंधाराचा फायदा घेत त्या ठिकाणाहून तो पळून गेला. फिर्यादी यांनी घडलेला प्रकार नातेवाईकांना सांगून त्या इसमाचा सर्वत्र शोध घेतला मात्र तो आढळून आला नाही. यावरून एकूण दोन लाख सत्तर हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने अज्ञात चोरट्याने पळवून नेल्याप्रकरणी लोणी काळभोर पोलिसांमध्ये त्यांनी फिर्याद दिली आहे. लोणीकाळभोर पोलिसांनी अज्ञात चोरट्या विरोधात गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप कांबळे करीत आहेत.

# थेऊर येथे अपघात, एकाचा जागीच मृत्यू

लोणीकाळभोर : सहकारनामा

पुणे- सोलापूर महार्गावरील कुंजीरवाडी (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील थेऊर फाटा येथे अज्ञात वाहनाच्या धडकेत एकजण जागीच ठार झाल्याची घटना रविवारी (ता. २१ ) पहाटे चार वाजण्याच्या सुमारास घडली आहे .

दत्ताराम गोविंद अडागळे(वय- ६३, रा.दातार कॉलनी,उरुळी कांचन,ता. हवेली) असे अपघातात मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तीचे नाव आहे. याप्रकरणी पुतणे अविनाश आत्माराम अडागळे (वय-३४रा.दातार कॉलनी, उरुळी कांचन, ता.हवेली ) यांनी लोणी काळभोर पोलिसात अज्ञात व्यक्तीविरोधात तक्रार दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अविनाश अडागळे व त्यांचे चुलते हे एकत्रित राहतात. काही दिवसांपासून लोणीकंद ते थेऊर फाटा या रोडचे काम चालू असल्याने त्या रोडवरती मोठी वाहने जाऊ नये म्हणून कालिका सिक्युरिटी कंपनीला या रोडचे कॉन्ट्रॅक्ट दिले आहे. त्यानुसार दत्ताराम अडागळे हे सिक्युरिटीगार्ड म्हणून संध्याकाळी कामासाठी नेमले होते. दरम्यान, रविवारी (ता.२१)पहाटे पाच वाजण्याच्या सुमारास सुरक्षारक्षक अधिकारी मोहन प्रेमचंद यांचा अविनाश अडागळे यांना फोन आला की थेऊर फाटा या ठिकाणी तुमचे चुलते दत्ताराम अडागळे हे काम करीत असताना अपघात झाला असून तुम्ही लवकर या. त्यावेळी चुलत भाऊ सिद्धार् अडागळे, सनी अडागळे, असे थेऊर फाट्यावर गेले असता ते सिक्युरिटीत काम करत असलेले बेनी सवारे यांनी सांगितले की ४.वा.च्या सुमारास सोलापूर कडील बाजूने पुणेकडे जाणाऱ्या एका अज्ञात गाडीने गोविंद अडागळे यांना धडक दिली. या धडकेत दत्ताराम अडागळे रस्त्यावरच कोसळल्या मुळे पुण्याकडे जाणारी इतर वाहने त्यांच्या अंगावरून गेल्यामुळे त्यांच्या शरीराचा चेंदामेंदा झाला होता. तसेच त्या ठिकाणी गाडीची नंबर प्लेट तुटलेल्या अवस्ते आढळून आली. पोलिसांनी अज्ञात व्यक्तींविरोधात गुन्हा दाखल केला आहे. तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप कांबळे करीत आहेत.

# आ.राहुल कुल यांच्या हस्ते केडगावमध्ये स्वतंत्र पाणी पुरवठा योजनेचा शुभारंभ

दौंड : सहकारनामा



केडगाव येथे असणाऱ्या सद्गुरू चौरंगीना महाराज मठ (नवनाथ मंदिर, पहाड) येथे धर्मनाथ बीज व अखंड हरीनाम सप्ताहाच्या निमित्ताने केडगाव ग्रामपंचायतीच्या माध्यमातून व आमदार दौंडचे आमदार राहुल कुल यांच्या सूचनेनुसार पद्मावती तळे ते नवनाथ मंदिर (पहाड) येथे स्वतंत्र पाणी व्यवस्था करण्यात आली आहे.

या पाणी पुरवठा योजनेचे उदघाटन दि.१३ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६:३० वाजता करण्यात आले. यावेळी केडगावचे सरपंच अजित शेलार पाटील, उपसरपंच अशोक हंडाळ ग्रामविकास अधिकारी डोळस भाऊसाहेब यांनी त्यांचे स्वागत केले. या उद्घाटन कार्यक्रम प्रसंगी आमदार राहुल कुल यांनी केडगाव व तालुक्याच्या विकासासाठी आपण कटिबद्ध असून कोणतेही गाव हे विकासापासून वंचित राहणार नसल्याचे सांगितले. या कार्यक्रमाला केडगाव पंचक्रोशीतील विविध मान्यवर, भाजप पदाधिकारी, भाविक मंडळी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नराधम बापानेच केला स्वत:च्या मुलीवर बलात्कार

## यवत पोलिसांनी ठोकल्या बेड्या

दौंड : सहकारनामा

दौंड तालुक्यातील वडगाव बांडे येथे मानवतेला काळिमा फासणारी घटना घडली असून बापानेच स्वतःच्या अल्पवयीन मुलीवर बलात्कार केल्याची मन सुन्न करणारी घटना घडली आहे. याबाबत पीडित मुलीच्या आईने फिर्याद दिली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार दि.१९/०२/२०२१ रोजी सायं. ६:०० चे सुमारास वडगांवबांडे ता.दौंड जि.पुणे या गांवचे हददीत फिर्यादी राहत असलेल्या खोलीत पिडीत मुलीचा वडीलाने मुलगी (वय १३ वर्षे ४ महिने) ही अल्पवयीन असल्याचे माहित असताना सुध्दा मुलगीवर जबरदस्तीने शारीरीक संबध केले आहेत.

याबाबत यवत पोलिसांनी नराधम बापास अटक केली आहे. मानवतेला काळिमा फासणाऱ्या या घटनेने सर्वत्र संताप व्यक्त केला जात आहे. अशा प्रवृत्तीला फाशीची शिक्षासुद्धा कमी पडेल असे कृत्य हे नराधम करू लागले आहेत, त्यामुळे अशा नराधमांना कठोर शिक्षा होणे गरजेचे बनले आहे. आरोपी विरुध्द त्याच्या पत्नीने फिर्याद दिली असून पुढील तपास पोलीस निरीक्षक भाऊसाहेब पाटील यांच्या मार्गदर्शना खाली सपोनि कापरे हे करत आहेत.

# कोरोनाच्या संकटामुळे यवतची यात्रा रद्द

दौंड : सहकारनामा

दौंड तालुक्यातील यवत येथील श्री काळभैरवनाथ व महालक्ष्मी माता आईची यात्रा कोरोनाच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे रद्द करण्याचा निर्णय यवत ग्रामस्थ आणि यात्रा उत्सव समितीने घेतला आहे. हा यात्रोत्सव शनिवार दि.२७/०२/२०२१ ते रविवार दि २८/०२/२०२१ रोजी संपन्न होत आहे. परंतु कोरानाच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे ग्रामस्थ मंडळींनी आढावा घेऊन हि यात्रा रद्द करण्याचा निर्णय घेतला असला तरी यात्रेनिमित्त होणारे देवांचे धार्मिक कार्यक्रम विधीवत केले जाणार असल्याची माहिती यवतचे सरपंच समीर दोरगे तसेच श्री काळभैरवनाथ देवस्थान व इतर देवसन ट्रस्ट यांच्यावतीने देण्यात आली आहे.

यवतची यात्रा हि पंच क्रोशीत आकर्षणाचा विषय असतो. या यात्रेमध्ये लोकनाट्य तमाशा तसेच कुस्तीचा आखाडा हे आकर्षणाचे केंद्रस्थानी राहून भाविक भक्तांची मोठी रेलचेल पाहायला मिळते. मात्र कोरोनाच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे हि यात्रा यावेळी रद्द करण्यात आली आहे.

# खासदार संजय राऊत यांची चौफुला शिवसेना कार्यालयास सदिच्छा भेट

दौंड : (सहकारनामा): शिवसेना नेते खासदार संजय राऊत यांनी आज चौफुला ता.दौंड येथील शिवसेना कार्यालयास सदिच्छा भेट दिली, यावेळी त्यांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत शिवसेना उपजिल्हा प्रमुख महेश पासलकर यांनी केले.

यावेळी खा.संजय राऊत यांनी दौंड तालुक्यातील शिवसेनेची पक्षबांधणी, शिवसेना मध्यवर्ती कार्यालय चौफुला येथे होत असलेला जनता दरबार व शिवसैनिकांकडून होत असलेली कामे याचा आढावा घेतला. खा.संजय राऊत यांनी या प्रसंगी शिवसेना उप जिल्हाप्रमुख महेश पासलकर यांच्या कामाचे कौतुक केले. यावेळी दैनिक सामनाचे सहाय्यक संपादक प्रभाकर पवार, उपतालुका प्रमुख विजयसिंह चव्हाण, युवा सेना तालुका समन्वयक समीर भोईटे, पडवी ग्राम सदस्य दत्तात्रय चव्हाण, रोटी गावचे माजी सरपंच दीपक भंडलकर, कार्यालयीन प्रमुख प्रशांत खराडे, शिवसेना रोटी शाखाप्रमुख गणपत शितोळे, संदीप कद्रू, शुभम माळवे, किरण वाघमारे रावणगावचे शाखा प्रमुख सुनिल थोरात व इतर शिवसैनिक पदाधिकारी उपस्थित होते.

